**<u>विशेष दिवाणी दावा क्र.०६/२०१३ मधील नि.क्र.४१ वरील आदेश</u>**
**(<u>सौ. स्वाती हरिशचंद्र पाटील विरुध्द श्रीमती अरुणा राजेश पाटील</u> )**
**(<u>CNR No.MHSN020000452013</u>)**

१. वादी यांनी मुळ दावा करारपत्रावरुन खरेदीपत्र होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी मौजे बेडग येथील गट नं.१३१८/१ या मिळकतीपैकी पश्चिम बाजुच्या २ हेक्टर ३६ आर मिळकतीबाबत करारपत्र केलेले होते व आहे.

२. सदरहु मिळकतीपैकी १ हेक्टर १८ आर या क्षेत्राचे विकास पाटील यांनी वादीच्या हक्कात खरेदीपत्र करुन दिलेले आहे.

३. परंतु अशी परिस्थिती असताना ज्यावेळेस मुळ करारपत्र impound करण्यासाठी मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविले त्यावेळेस त्यांनी संपूर्ण २ हेक्टर ३६ आर या मिळकतीचे मुल्यांकन केले अशी हरकत वादी यांनी उपस्थित केलेली आहे. त्यामुळे केवळ १ हेक्टर १८ आर इतक्याच क्षेत्राचे मुल्याकंन करुन दिनांक २०/१०/२०११ रोजीचे करारपत्र impound करण्यात यावे अशी मागणी वादी यांनी केलेली आहे.

४. सदरहु अर्जाला अनुसुरुन प्रतिवादी यांनी नि.क्र.४४ कडे त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल केलेले आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे वादी हे जाणीवपूर्वक दंडाची रक्कम भरण्याचे टाळत असून दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकत आहेत. त्यामुळे त्यांनी वादींचा अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

५. वादी–प्रतिवादी यांच्या परस्परविरोधी कथनांना अनुषंगून मुळ दाव्याचे, दिनांक २०/१०/२०११ रोजीच्या तथाकथित झेरॉक्स कराराचे, तसेच यापूर्वी सदरचा करार impound साठी पाठविल्यानंतर जो दिनांक ०८/०१/२०१८ रोजी मुद्रांक जिल्हाधिकारी, सांगली यांनी आदेश केलेला होता त्याचे अवलोकन केले.

६. दिनांक २०/१०/२०११ रोजीचा तथाकथीत करार हा २ हेक्टर ३६ आर इतक्या मिळकतीचा आहे असे झेरॉक्स कागदावरुन दिसून येते. दिनांक

०८/०१/२०१८ रोजीच्या मुद्रांक जिल्हाधिकारी, सांगली यांच्या आदेशामध्ये स्पष्टपणे संपूर्ण मिळकतीचे बाजार तक्त्यानुसार २४,९९,२४०/– रुपये इतके मुल्यांकन करण्यात आलेले होते. परंतु दस्तामध्ये ५३,१०,०००/– रुपये इतका मोबदला दर्शविण्यात आलेला आहे. त्यामुळे मुल्यांकन रक्कमापेक्षा मोबदला रक्कम ही जास्त असल्यामुळे सदरचा दस्त impound करताना २,१२,४००/– रुपये इतके मुद्रांक शुल्क अदा करण्याबाबत आदेश करण्यात आलेला होता. अत्यंत महत्वाची व विचार करण्यासारखी बाब म्हणजे मुद्रांक जिल्हाधिकारी यांचा निर्णय मान्य नसल्यास मा. नोंदणी उप महानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग पुणे यांचेकडे अपील दाखल करता येवू शकते असे आदेशामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे. वादी यांनी त्यांना दिनांक ०८/०१/२०१८ रोजीचा मुद्रांक जिल्हाधिकारी, सांगली यांचा दस्त impound करण्यासाठी २,१२,४००/– रुपये इतका मुद्रांक भरावा लागेल हा आदेश अमान्य आहे व त्यांनी त्यासंदर्भात अपील केलेले आहे असे अर्जात कुठेही नमूद केल्याचे दिसून येत नाही.

७. वादींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी दावा मिळकतीपैकी १ हेक्टर १८ आर इतक्या मिळकतीचे खरेदीपत्र यापूर्वीच करुन घेतलेले आहे. परंतु तथाकथीत २०/१०/२०११ रोजीचा संपूर्ण दस्त जोपर्यंत impound होत नाही तोपर्यंत वादीने संपूर्ण मिळकतीपैकी काही क्षेत्राच्या मिळकतीचे खरेदीपत्र करुन घेतले हा त्यांचा बचाव निरर्थक होणार आहे. त्यामुळे संपूर्ण २०/१०/२०११ रोजीच्या कराराला अनुषंगून तो दस्त impound होणे अत्यंत गरजेचे आहे.

८. त्यामुळे वादी हे मा. नोंदणी उप महानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग पुणे यांचेकडे दिनांक ०८/०१/२०१८ रोजीच्या मुद्रांक जिल्हाधिकारी सांगली यांच्या आदेशाला अनुषंगून अपील न करता, केवळ त्यांनी २ हेक्टर ३६ आर या मिळकतीपैकी १ हेक्टर १८ आर या मिळकतीचे खरेदीपत्र केले, म्हणून संपूर्ण मिळकतीच्या संदर्भात जे करारपत्र impound करताना कोर्ट फी ची रक्कम होवू शकेल त्यामध्ये वादी कोणतीही सुट मिळविणेस हक्कदार ठरत नाहीत. त्यामुळे वादींचा अर्ज फेटाळण्यास पात्र ठरतो. सबब आदेश खालीलप्रमाणे.

## <u>आदेश</u>

१. वादी यांचा नि.क्र.४१ कडील अर्ज खर्चासह फेटाळण्यात येतो.

२. सदरहु आदेशाची वादी–प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी.

Abhay Ashok Mehendale

Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2022.06.17 11:34:36 +0530

**सांगली.** **(अ. अ. मेहेंदळे)**

**दिनांकः१५.०६.२०२२** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | – | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | – | १५/०६/२०२२ |

**पी.डी.एफ./अपलोडचा दिनांक–** १७/०६/२०२२